॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
२५ रौप्यमहोत्सवी वर्ष

Phone: (02462) 229242
Fax : (02462) 229572

SWAYAM & MOOC COURSES CENTER

Website: srtmun.ac.in
E-mail: darkundenitin@gmail.com

जा.क्र./ SWAYAM /२०१८–१९/०३ दिनांक १८.०२.२०१९

## परिपत्रक

सर्व संबधितांस या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २५.०१.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ५७ व्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय क्र. १३, १४/५७–२०१९ अन्वये **SWAYAM/NPTEL/MOOC Online** कोर्सेस संबधी खालील प्रमाणे निर्णय झालेले आहेत.

१. विद्यापीठ संकुलातील SWAYAM/NPTEL/MOOC Online कोर्सेसला ८०% किंवा त्यापेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणी शुल्काची संपूर्ण रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून परत देण्यात येईल.

२. विद्यापीठ संकुलातील SWAYAM/NPTEL/MOOC Online कोर्सेसला ७०% ते ७९% घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणी शुल्काच्या ५०% रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून परत देण्यात येईल.

३. विद्यापीठ संकुलातील SWAYAM/NPTEL/MOOC Online कोर्सेस उत्तीर्ण झालेल्या शासनमान्य पदावरील नियमित शिक्षकांना त्या – त्या कोर्सची नोंदणी शुल्काची रक्कम परत देण्यात येईल.

४. सदरील खर्च हा प्रत्येक संकुलातील शैक्षणिक परिषदा/चर्चासत्र या बजेट हेड मधून करण्यात यावा.

तरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी खाली नमूद केलेल्या नियम, अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

### नियम, अटी व शर्ती:

१. सदर विद्यार्थी, शिक्षक यांनी इतर कुठल्याही अर्थिक स्त्रोतांमधून सदरील नोंदणी शुल्क परत मिळवित नाहीत, असे प्रतिज्ञापत्र त्या – त्या संकुलातील संचालका मार्फत सादर केल्या नंतरच त्यांच्या नोंदणी शुल्काची रक्कम परत मिळेल.



Scanned by CamScanner

२. काही कोर्सेस केवळ उत्तीर्ण केल्यावरही संपूर्ण नोंदणी फीस परत मिळण्याची तरतूद काही Platform वर आहे, तरी अशा प्रकरणात सदर विद्यार्थ्यांने/शिक्षकांनी, हया Platform वरून आम्हाला फीस परत मिळत नाही अथवा मिळणार नाही. असे प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतरच त्यांना सदर नोंदणी फीस परत मिळवण्याची मुभा राहील.

३. विद्यापीठ केंद्र व उपकेंद्र, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे शिक्षण घेणारे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी तसेच या ठिकाणी कार्यरत असणा—या शासनमान्य नियमित पदांवरील संशोधक मार्गदर्शकांकडे पूर्णवेळ (इतरत्र नोकरी/व्यवसाय नसणारे) संशोधन कार्य करणारे सर्व विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेण्यात पात्र असतील.

४. जर विद्यापीठ संकुलातील शिक्षक/विद्यार्थी NPTEL Course ला नावनोंदणी (Course Enrolment) आणि NPTEL Course परीक्षा नाव नोंदणी (Course Exam Registration) करीत असतील तर त्यांनी आपल्या विद्यापीठाच्या NPTEL Local Chapter मार्फत सदर बाबी करणे बंधनकारक राहील. NPTEL Local Chapter मार्फत नाव नोंदणी केल्यावरच सदर कोर्सेसची नोंदणी शुल्काची रक्कम परत मिळविण्याची मुभा असेल.

कुलसचिव

**प्रतः**

०१) सर्व संकुलाचे संचालक, प्रस्तुत विद्यापीठ.

०२) सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ.

०३) संचालक, विद्यापीठ उपपरिसर लातूर, प्रस्तुत विद्यापीठ.

०४) प्रभारी संचालक, उपपरिसर परभणी, प्रस्तुत विद्यापीठ.

०५) प्रभारी प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहितीस्तवः**

०१) मा. कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.

०२) मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.

०३) डॉ. नितीन श्रीधर दारकुंडे, समन्वयक, SWAYAM & MOOC Courses Center, प्रस्तुत विद्यापीठ.



Scanned by CamScanner